जळगाव (प्रतिनिधी) दि. २२ :- कृत्रिम बुध्दीमत्तेचा वेगवेगळया माध्यमातून प्रचंड प्रमाणात वापर होत आहे, कृत्रिम बुध्दिमत्तेमुळे निर्मिती होत असली तरी मानवी बुध्दीमत्तेमुळे नवनिर्मिती होते असे प्रतिपादन एमकेसीएलचे मुख्य मार्गदर्शक विवेक सावंत यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा व पीएम उषा अंतर्गत " बोध, मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता " (कॉग्निजन ह्यूमन अँड आर्टिफिशियल इंटेलिजंट) या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेची पूर्व कार्यशाळा दिनांक २२ रोजी सिनेट सभागृहात आयोजित करण्यात आली. यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, माजी कुलगुरु डॉ. के.बी. पाटील, प्र - कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, डॉ. पवित्रा पाटील, प्रा. जे. व्ही. साळी, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके, निमंत्रक डॉ. संदीप भामरे, समन्वयक प्रा. सुरेंद्र कापसे उपस्थित होते.

कृतीशील एआयव्दारे जागतिक समस्यांचे निराकरण याविषयी विवेचन करतांना विवेक सावंत कृत्रिम बुध्दीमत्तेच्या उगमापासून आतापर्यंतच्या प्रवासाची मांडणी केली. जगात झालेल्या आधुनिकीकरणात मानवी प्रक्रीयेव्दारे करण्यात आलेले काम व आता कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर करुन होत असलेली सहजता या बाबत कथन करतांना त्यांनी गुगल, चॅट जीपीटी व आता एआयचा होत असलेल्या वापराबाबत विविध दाखले दिले. आजच्या डीजीटल युगात एआय केवळ तंत्रज्ञानापुरती मर्यादीत न राहता मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवित आहे. विविध एआय तंत्र कशा प्रकारे कार्य करतात त्यांचा प्रत्यक्ष उपयोग काय तसेच आगामी काळात त्यांचा कसा वापर होणार आहे याची सविस्तर माहिती त्यांनी दिली. एआय वापराबाबतचे जसे फायदे आहेत तसेच त्याच्या तोटयांची माहिती देत त्यांनी ऑनलाईन फसवणुकीत वाढ झाली असल्याचे सांगितले. त्यामुळे ऑनलाईन कामकाज करतांना सावधान राहण्याची आवश्यकता असल्याचा सल्ला त्यांनी दिला एआय हा मानवाप्रमाणे भावना व्यक्त करु शकत नाही, अनुभवजन्य निर्णय घेऊ शकत नाही त्यामुळे एआय वर पूर्ण विसंबून न राहता त्यास केवळ सहकारी म्हणून वापरावे असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करतांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी आजच्या व भविष्यायातील जगात टिकून राहण्यासाठी एआय हे एक सक्षम तंत्र आहे. त्यामुळे एआयची मूलभूत माहिती जाणून घेणे आवश्यक आहे. नव्या तंत्रज्ञानातील कौशल्य प्राप्त करणे अत्यंत आवश्यक असून विद्यार्थ्यांना करीअरची संधी आहे. एआयचा प्रभाव असला तरी माहिती गोपनीयतेचा प्रश्न निर्माण होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. एआयची निर्मिती मानवाकडून झाली असल्याने तो मानवी कामे तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अल्पावधीत करु शकतो मात्र त्याची अचुकता केवळ त्याच्याकडे असलेल्या माहितीवरच अवलंबून असल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी एमकेसीएल आणि विद्यापीठाच्या सिलेज बेस्ड एरिया डेव्हलपमेंट प्रोग्राम (सीएडीपी) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. उदघाटनानंतर पहिल्या सत्रात अमीत रानडे व दुसऱ्या सत्रात तन्मय दिक्षित यांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक प्रा.राम भावसार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.अश्वीनी काकडे, प्रा.वीणा महाजन व रेवती पाटील यांनी तर आभार डॉ. संदीप भामरे यांनी मानले. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

**आजपासून आंतरराष्ट्रीय परिषद :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा व पीएम उषा अंतर्गत " बोध, मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता " (कॉग्निजन ह्यूमन अँड आर्टिफिशियल इंटेलिजंट) या विषयावर विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात दिनांक २३ रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन होणार आहे .यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नीती आयोगाचे वरिष्ठ सल्लागार व्ही.के. सिंग, विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव प्रा.मनीष जोशी तर बीजभाषक म्हणून मलेशिया येथील आयएनटीआय इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे प्र- कुलगुरू खांग वेन गोह उपस्थित राहणार आहेत. तसेच मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, विद्यापीठाचे प्र - कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत.

विद्यापीठात होणाऱ्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत वेगवेगळया सहा सत्रात आंतरराष्ट्रीयकीर्तीचे वक्ते मार्गदर्शन करणार असून प्राप्त झालेल्या संशोधन पेपर्सचे सादरीकरण ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही माध्यमातून होणार आहे. दिनांक २३ रोजी आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनानंतर हैदराबाद विद्यापीठ येथील प्रा. राजीव वनकर, जॉनाथन डूने,जापान येथील प्रा. केनजी डोया मार्गदर्शन करतील. त्यानंतर सायंकाळी .६.३० सांस्कृतिक कार्यक्रम होईल. दुसऱ्या दिवशी दि.२४रोजी जीएसएफसी विद्यापीठ वडोदरा येथील कुलगुरू प्रा. जी. आर. सिन्हा, बिट्स पिलानी हैदराबाद येथील प्रा. परेश सक्सेना, सुरत येथील डॉ. सुनिलकुमार मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी ४ वाजता विद्यापीठाचे प्र - कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप होणार आहे.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.प्रा. जी. आर. सिन्हा,नागपूर येथील आंबेडकर स्कूल ऑफ गव्हर्नमेंट चे संचालक मंगेश दहिवाले यांच्यासह अधिष्ठाता प्रा. एस.एस. राजपूत, प्रा. अनिल डोंगरे, कुलसचिव डॉ विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी सर्वोत्कृष्ट सादरीकरण आणि संशोधन पेपर्सला पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य संयोजक तथा संगणक शास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. राकेश रामटेके यांनी दिली. आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी व्हावे असे आवाहन संचालक प्रा. राकेश रामटेके, प्रा . एस.आर.कोल्हे, सचिव डॉ. अजय सुरवाडे, समन्वयक डॉ.अजय पाटील, सहसमन्वयक डॉ. राम भावसार यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २२ :- महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय महाराष्ट्र राज्य व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२६ निमित्ताने 'बोलींचा जागर' हा कार्यक्रम दि.२३ जानेवारी २०२६ वार शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी जळगाव भागात बोलल्या जाणाऱ्या 'लेवागण बोली', 'तावडी बोली', 'जामनेरी बोली', या प्रमुख बोलींच्या अभ्यासकांना आमंत्रित करण्यात आले आहे. यात लेखक रवींद्र पांढरे (जामनेरी बोली), लेखक डॉ. अशोक कौतिक कोळी (तावडी बोली), कवयित्री श्रीमती संध्या महाजन (लेवागण बोली) हे लेखक, अभ्यासक या बोलींच्या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. यासोबतच खानदेशातील स्थानिक लोककला प्रकारांना देखील बोलींच्या जागराच्या निमित्ताने विद्यापीठ मंचावर आणणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. त्यासाठी जळगाव येथील श्री.संतोष शामराव चौधरी यांच्या वाल्मिकी वही गायन मंडळाचे 'वही गायन' व भडगाव येथील परशुराम रुंझू सूर्यवंशी यांच्या पंचरंगी जागरण गोंधळ कलापथकातील 'वाघ्या मुरळी यांचे नृत्य' सोबतच 'खानदेशातील वीर नृत्य' तसेच क्रांतीभाऊ सोनवणे यांच्या कोळी लोकनाट्य तमाशा मंडळाचा 'लोकनाट्य तमाशा' कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे.

वही गायनाच्या कार्यक्रमात संतोष शामराव चौधरी यांच्यासोबत त्यांच्या मंडळातील गोकुळ देवराम बारी, अनिल शामराव चौधरी, जगदीश दर्शन परदेशी, निलेश विजय धनगर, विठ्ठल पांडुरंग बारी, प्रशांत गबा चौधरी यांचा सहभाग असणार आहे. सोबतच पंचरंगी जागरण गोंधळाच्या कार्यक्रमासाठी परशुराम रुंझू सूर्यवंशी यांच्यासोबत भाऊसाहेब रुंझू सूर्यवंशी, आत्माराम फकीरा बोरसे, अभिजित परशुराम सूर्यवंशी, मगन पुंजू भराडी, रवींद्र राजाराम सोनवणे यांचा सहभाग असणार आहे. आणि क्रांतीभाऊ सोनवणे यांच्यासोबत लोकनाट्य तमाशा मंडळातील साथीदार या कार्यक्रमासाठी असणार आहेत.

सकाळी नऊ वाजता ग्रंथदिंडीने या कार्यक्रमाची सुरुवात भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र येथून होईल. त्यानंतर सकाळी दहा वाजता यु. आय. सी. टी सभागृह येथे ग्रंथ दिंडीचा समारोप होऊन कार्यक्रमाची सुरुवात होईल. तरी या कार्यक्रमासाठी मराठी भाषेच्या, बोली भाषेच्या अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विद्यापीठ तसेच भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक माननीय प्रा. डॉ. म. सु. पगारे यांच्याकडून करण्यात आले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २२ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता